सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ सोलापूर संचलित

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर संलग्नित

# संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मंद्रुप

## वार्षिक अहवाल २०२३-२०२४

'ईवलेसे रोप लावियले व्दारी तयाचा वेलू गेला गगनावरी' या उक्तीप्रमाणे सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ,सोलापूर या संस्थेचे राजर्षी शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून मंद्रुप येथे २००१ साली स्थापन झालेले संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हे दरवर्षीप्रमाणे उत्तरोत्तर उज्ज्वल कामगिरी करणारे ठरले. २०२३-२०२४ हे शैक्षणिक वर्ष देखील त्यास अपवाद नाही. म्हणूनच १९ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये हा वार्षिक अहवाल आपण सर्व मान्यवरांसमोर मांडताना मनात थोडीशी अस्वस्थता आहे. कारण याच शैक्षणिक वर्षात दि.१५ ऑक्टोंबर २०२३ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांचे दुर्देवाने दु:खद निधन झाले. तदनंतर संस्थेने प्र.प्राचार्य म्हणून मला दिलेल्या जबाबदारीतून हा अहवाल मांडत आहे.

**महाविद्यालयात शिकवले जाणारे अभ्यासक्रम व प्रवेशित विद्यार्थी संख्या -**

२०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात बी.ए.ची विद्यार्थी संख्या ३९६,बी.कॉम.ची विद्यार्थी संख्या २१७ तर बी.एस्सी.ची विद्यार्थी संख्या २०९ असे एकूण ८२२ विद्यार्थी अध्ययन करत आहेत. गतवर्षीच्या वार्षिक परीक्षेच्या निकालाची परंपरा कायम आहे. शिक्षणापासून वंचित असणा-या गरजूंसाठी महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा बी.ए.पदवीचा शिक्षणक्रम सुरु असून, यावर्षी २२८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

**विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी -**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना अनेक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा तपशील पुढीलप्रमाणे-

**आविष्कार महोत्सव -** महाविद्यालयात दि.३०/११/२०२३ रोजी महाविद्यालय स्तरावरील आविष्कार महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे सचिव मा.श्री.एम.डी.कमळे सर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.एस.एन.कदम हे होते.



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

(बी.कॉम भाग-२) व कु.ईशिता गायकवाड (बी.एस्सी भाग-१)यांना विभागून उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. त्याचप्रमाणे सांघिक मध्ये कु.स्वप्नाली सिंदखेडे (बी.कॉम भाग-३) व कु.सुप्रिया सिंदखेडे (बी.कॉम भाग-१) यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. दि.१६/०१/२०२४ रोजी महाविद्यालयात निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत कु.मंजुळा खुटाळे (प्रथम), कु.मैना गावडे व कु.कांचन कोळी यांना विभागून व्दितीय क्रमांक देण्यात आला. तर कु.शैला तेली व सिध्दाराम बन्ने यांना विभागून तृतीय क्रमांक देण्यात आला. तसेच कु.धनश्री स्वामी व कु.ऐश्वर्या स्वामी यांना विभागून उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आला. दि.०८/०९/२०२३ रोजी रासेयोच्यावतीने महाविद्यालयात चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत स्वप्नील खसगे प्रथम, कु.आस्मा पिंजार व्दितीय व कु.सदफ शेख हिने तृतीय क्रमांक पटकाविला. दि.२८/१२/२०२३ रोजी महाविद्यालयात जिल्हा परिषद सोलापूर शिक्षण विभाग आयोजित वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत वरीष्ठ स्तरातून कु.सदफ शेख प्रथम, तर कु.मंजुळा खुटाळे हिने व्दितीय क्रमांक पटकाविला.

**विद्यार्थ्यासाठी दिले जाणारे पुरस्कार -**

महाविद्यालयीन पातळीवर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी विविध पुरस्कार देण्यात येतात. शैक्षणिक,सांस्कृतिक,क्रीडा व एन.एस.एस. या विभागातील उज्ज्वल कामगिरी, वर्षभरातील नियमितता व वर्तन योग्य असणा-यास कै. संतोष भीमराव पाटील यांच्या स्मरणार्थ संतोष पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. तर पदवी परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या विद्यार्थ्यास कै.दी..शि.कमळे गुरुजी यांच्या स्मरणार्थ दीनबंधू पुरस्कार दिला जातो. बी.कॉम.पदवी परीक्षेत प्रथम येणा-यास कै.गंगप्पा गदग यांच्या स्मृतीप्रित्यर्थ डॉ.व्ही.जी.गदग यांचे तर्फे गदग पुरस्कार दिला जातो. तसेच बी.कॉम.पदवी परीक्षेत मुलींमध्ये प्रथम येणा-या विद्यार्थीनीस कै.भाऊराव बदनोरे यांच्या स्मरणार्थ श्री.उदय बदनोरे यांचे तर्फे गुणवत्ता पुरस्कार दिला जातो.

सांगायला अतिशय आनंद होतो की, यावर्षी या पुरस्कारामध्ये भरघोस वाढ झाली असून कै.जवाहर कमळे यांचे स्मरणार्थ विज्ञान शाखेत महाविद्यालयात प्रथम येणा-यास मा.श्री.नागेश बिराजदार यांचेवतीने कै.जवाहर कमळे पुरस्कार दिला जात आहे. तसेच स्व.प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांचे स्मरणार्थ महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष पत्रकार श्री. अमोगसिध्द मुंजे यांचे तर्फे, महाविद्यालयातील सर्व शाखांमध्ये गुणानुक्रमे प्रथम येणा-यास गुरुवर्य पुरस्कार दिला जात आहे,



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

या महोत्सवात एकूण ३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेउन विविध विषयावर आपले संशोधन प्रकल्प सादर केले. तसेच दि.३ व ४ जानेवारी २०२४ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव पार पडला. या महोत्सवात आपल्या महाविद्यालयातील बी.एस्सी.भाग-३ मधील कु.स्वाती बोळकोटे , कु. प्रिती कुंभार , कु.भाग्यश्री बिराजदार या विद्यार्थीनीनी सहभाग घेतला. या तिनही स्पर्धकांनी आपल्या संशोधन प्रकल्पाचे यशस्वी सादरीकरण केले. या विभागाचे समन्वयक म्हणून डॉ.आर.एम.मोरे यांनी काम पाहिले.

दि.३१ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने शहिद लेफ्टनंट दत्तात्रय पुजारी यांच्या स्मरणार्थ वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये कु.सदफ शेख (प्रथम),कु.प्रिती बगले (व्दितीय), कु.ऐश्वर्या बिराजदार (तृतीय) आणि कु.मंजुळा खुटाळे (उत्तेजनार्थ) असे क्रमांक पटकाविले.विजेत्यांना अनंत पुजारी सोलापूर यांच्यावतीने सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र पारितोषिक वितरण समारंभात वितरण करण्यात येणार आहे. दि.१६/०९/२०२३ रोजी महाविद्यालयामध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती व महिला विकास कक्ष यांच्यावतीने पाक कला स्पर्धा पार पडली.या स्पर्धेमध्ये कु.ईशिता द.गायकवाड (बी.एस्सी भाग-१) व कु.रोहिणी कोनाळे (बी.एस्सी भाग-३) यांना प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला. तर व्दितीय क्रमांक कु.आसमा पिंजार (बी.कॉम भाग-३) व कु.प्रिती बिराजदार (बी.ए.भाग-१) यांना विभागून देण्यात आला. तसेच तृतीय क्रमांक कु.जयश्री पुजारी (बी.कॉम भाग-३) व कु.वैभवी पवार (बी.एस्सी भाग-१) यांना विभागून देण्यात आला. याशिवाय उत्तेजनार्थ कु.रुक्साना शेख (बी.कॉम भाग-३) व कु.अबोली स्वामी(बी.एस्सी भाग-३) यांना विभागून देण्यात आला. या विभागाच्या समन्वयक म्हणून प्रा.श्रीमती बी.एस.कोरे यांनी काम पाहिले. दि.१२/०१/२०२४ रोजी महाविद्यालयात शिवराज्याभिषेक १५० वर्षपूर्ती निमित्त मराठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत (बी.एस्सी भाग-१) मधील कु.ऐश्वर्या बिराजदार हिने प्रथम, कु.मंजुळा खुटाळे (बी.ए.भाग-१) हिने व्दितीय तर कु.सदफ शेख (बी.भाग-१) हिने तृतीय क्रमांक मिळविला.प्रथम विजेत्या ऐश्वर्या बिराजदार हिची विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत निवड झाली. सांस्कृतिक विभागाच्यावतीने दि.१३/०१/२०२४ रोजी पारंपारिक वेशभुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत सिध्दाराम बन्ने (बी.ए.भाग-१) याने प्रथम ,कु.स्वप्नजा बिराजदार(बी.एस्सी भाग-२) व्दितीय तर कु.वैभवी पवार (बी.एस्सी भाग-२) यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. कु.लक्ष्मी व्हनमाने



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

याशिवाय स्व.सौ.भारतीताई प्रकाश कोळी यांचे स्मरणार्थ प्रा.पी.बी. कांबळे यांचे तर्फे महाविद्यालयातील सर्व शाखांमधील मुलींमध्ये गुणानुक्रमे प्रथम येणा-या मुलीस स्व.भारतीताई कोळी पुरस्कार दिला जात आहे. तर कै.भानुदास कांबळे यांचे स्मरणार्थ प्रा.पी.बी.कांबळे यांचेवतीने महाविद्यालयातील भूगोल विभागात प्रथम येणा-यास कै.भानुदास कांबळे स्मृती पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. सर्वच पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम,सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे असणार आहे.तसेच दरवर्षी प्रमाणे बी.ए.भाग-३ इतिहास विभागात प्रथम येणा-यास प्रा.एम.पी.कसबे व प्रा.डॉ.एन.डी.बनसोडे यांच्यावतीने धर्मानंद कोसंबी पुरस्कार दिला जातो. याशिवाय बी.ए.भाग-३ मराठी विभागात प्रथम येणा-यास प्रा.डॉ.जवाहर मोरे यांच्यावतीने कै.डॉ.महेश निकम स्मृती पुरस्कार दिला जातो. आणि बी.ए.भाग-३ इंग्रजी विभागात प्रथम येणा-यास प्रा.एस.बी.धनशेटटी यांच्यावतीने विल्यम शेक्सपिअर पुरस्कार दिला जातो. याचबरोबर बी.ए.भाग-१ व २ हिंदी विषयात प्रथम येणा-यास प्रा.डॉ.बी.एन.आदटराव यांच्यावतीने संत कबीर पुरस्कार दिला जातो. तर बी.ए.भाग-१ व २ राज्यशास्त्र विषयात प्रथम येणा-यास प्रा.डॉ.मारुती हजारे यांच्यावतीने अनुक्रमे डॉ.बाबासाहेब आंबेडकर गुणवंत विद्यार्थी व दी.शि.कमळे गुरुजी गुणवंत विद्याथी पुरस्कार दिला जातो.

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग -**

दरवर्षी प्रमाणे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा उज्वल कामगिरी करणारा ठरला आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे -

दि.२६/०६/२०२३ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योग प्रशिक्षक म्हणून स्वामी विवेकानंद केंद्र,सोलापूर येथील योग शिक्षक रवी कंटली यांचे मार्गदर्शन लाभले. दि.२२/०७/२०२३ रोजी पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर रासेयो विभाग आयोजित युवा संवाद भारत @२०४७ या कार्यक्रमात १६ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला व लक्ष्मण माने बी.कॉम.भाग-३ याने नागरीकांची कर्तव्ये या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. दि.३०/०७/२०२३ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण घरोघरी या उपक्रमांतर्गत मंद्रुप गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. दि.०४/०८/२०२३ मेरी माती मेरा देश अंतर्गत शपथग्रहण,सेल्फी अपलोड करणे हा उपक्रम राबवण्यात आला. दि.०९/०८/२०२३ पंचप्रण शपथ घेण्यात आली. दि.१३/०८/२०२३ हर घर तिरंगा अभियानास सुरुवात करण्यात आली. दि.१४/०८/२०२३ कु.सदफ शेख हिच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.तसेच जलशुध्दीकरण केंद्र,



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

मंद्रुप येथे वृक्षारोपण करण्यात आले. दि.१५/०८/२०२३ स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण संस्थेचे सचिव श्री. एम.डी.कमळे सर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर खाऊ वाटप करण्यात आले. त्यानंतर एक मूठ माती संकलन करण्यात आली. दि.०८/०९/२०२३ साक्षरता दिना निमित्त चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. दि.१५/०९/२०२३ प्रजासत्ताक दिन संचलन निवड चाचणी शिबिरासाठी साहिल कादर व प्रिती राठोड यांनी सहभाग नोंदवला. दि.२८/१०/२०२३ महाविद्यालय परीसर स्वच्छता घेण्यात आली. दि.३१/१०/२०२३ राष्ट्रीय एकता दिन शपथ घेण्यात आली. दि.२८/११/२०२३ महात्मा फुले पुण्यतिथी निमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. दि.१२/०१/२०२४ युवा दिनानिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. दि.२५/०१/२०२४ राष्ट्रीय मतदार दिन निमित्त प्रतिज्ञा व नमो नवमतदाता लाईव्ह कार्यक्रम दाखवण्यात आला. दि.२६/०१/२०२४ प्रजासत्ताक दिन संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.पी.एल.कोळीसो । यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण पार पडले. यावेळी श्री. निलेश कोळी यांच्यावतीने खाऊ वाटप करण्यात आले. दि.३१/०१/२०२४ कुष्ठरोग निवारण दिनानिमित्त शपथ घेण्यात आली.विशेष म्हणजे मेरी माती मेरा देश या उपक्रमाअंतर्गत एक मूठ माती संकलन करुन अमृत कलश दिल्ली येथील कार्यक्रमात लक्ष्मण माने व कु.सदफ शेख या स्वयंसेवकामार्फत दि.३१/१०/२०२३ रोजी पोच करण्यात आला. त्याचबरोबर लक्ष्मण माने याने दि.२५/१२/२०२३ ते ०३/०१/२०२४ या कालावधीत गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय आव्हान शिबिरात सहभाग नोंदवला. तर साहिल कादर बी.ए.भाग-२ याची शिवाजी पार्क, मुंबई येथे झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी निवड झाली.

तसेच या विभागाचे यावर्षीचे विशेष श्रमसंस्कार शिबिर बसवनगर (तेरा मैल) येथे यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिराचे उद्घाटन सौ.कविता पाटील, अमृता काडादी, संस्था अध्यक्ष प्रकाश कोळी, उपाध्यक्ष डॉ.सी.जी.हविनाळे, सचिव एम.डी. कमळे, सरपंच निखिल राठोड व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. तसेच सोलापूर येथील विजयालक्ष्मी कुर्री, ॲड.देवयानी किणगी, प्रा.डॉ.मारुती हजारे, प्रा.डॉ.प्रभाकर कोळेकर व प्रसाद मोहिते यांची व्याख्याने झाली तर सौ.कविता सतीश पाटील यांच्या सौजन्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिर पार पडले. शिबिराचा समारोप पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलसचिव योगिनी घारे व संस्था उपाध्यक्ष डॉ.सी.जी.हविनाळे, सचिव एम.डी.कमळे,खजिनदार प्रा.व्ही.के.पाटील,विश्वस्त नागेश बिराजदार यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College Mandrup

शिबिर यशस्वी करण्यासाठी प्र.प्राचार्य डॉ.एस.एन.कदम यांचे मार्गदर्शन व रासेयो समिती सदस्य यांचे सहकार्य लाभले. या विभागाचे काम रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जवाहर मोरे व प्रा.डॉ.बी.एन.आदटराव यांनी पाहिले.

**जिमखाना विभाग -**

चालू वर्षी जिमखाना विभागाची नेत्रदीपक कामगिरी राहिली आहे. पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन खो-खो, कबड्डी, बुध्दीबळ, ॲथलेटिक्स, कुस्ती, बेसबॉल,सॉफ्टबॉल,तायक्वॉंदो इ.खेळात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. मळसिध्द व्हनमाने व अभिषेक चव्हाण यांची नांदेड येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच कु.प्रिती बगले,कु.पूजा उंबरजे,कु.ताईबाई चव्हाण यांची रेवा मध्यप्रदेश येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली. तर साहिल कादर व अभिषेक चव्हाण यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणारे येथे झालेल्या २५व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी निवड झाली. याशिवाय कु.प्रिती राठोड हिची राजस्थान येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच याच विद्यार्थीनीने पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेत ४६ ते ४९ वजनी गटात प्रथम क्रमांक मिळविला. याशिवाय रोहित माशाळे यांने कुस्तीमध्ये (ग्रीकी प्रकारात) ६७ किलो वजनी गटात व्दितीय क्रमांक पटकाविला. तर कु.साधना व्हनमाने हिने आंतरमहाविद्यालयीन बुध्दीबळ स्पर्धेत प्रथम कमांक पटकाविला. तसेच श्री.मळसिध्द व्हनमाने याने आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत ४००मीटर हर्डल्समध्ये तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच यावर्षी पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आयोजीत करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत महाविद्यालयाच्या खो-खो(पुरुष) संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. त्याचबरोबर दरवर्षीप्रमाणे या विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय योग दिन, राष्ट्रीय क्रीडा दिन व आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा इ.उपक्रम पार पडले. या विभागाचे काम शारीरिक शिक्षण संचालक डॉ.एस.एस.तोरवी हे पाहतात.

**ग्रंथालय विभाग-**

आपल्या ग्रंथालयात आज अखेर एकूण ग्रंथाची संख्या १३२२६ असून, ७९३९ क्रमिक पुस्तके,३६९७ संदर्भ पुस्तके आणि १५९० देणगी दाखल पुस्तकांचा समावेश आहे. विविध विषयावरील



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

नियतकालिकांची संख्या ३३ असून वर्तमानपत्राची संख्या १२ एवढी आहे. याशिवाय ग्रंथालयीन कामकाज सुरळितपणे चालविण्यासाठी SOUL ३.० नावाचे ग्रंथालय सॉफ्टवेअर कार्यरत आहे. CD/DVD ची संख्या ८० आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी बुक बॅंक योजनाही सुरु आहे.तसेच यावर्षी पासून शिक्षक व कर्मचारी यांच्यासाठी **पुस्तक भिशी** योजना सुरु केली आहे.या योजनेत २७ जणांनी सहभाग नोंदवला आहे. या विभागाचे काम ग्रंथपाल प्रा.व्ही.एस.गडगी पाहतात.

**युवा महोत्सव विभाग -**

दि.१०ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबर २०२३ या दरम्यान स्वेरी इंजिनिअरिग महाविद्यालय, पंढरपूर या ठिकाणी पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठाचा युवा महोत्सव संपन्न झाला. या महोत्सवात आपल्या महाविद्यायातील सांघिक प्रकारात ५ व वैयक्तिक ११ प्रकारात विद्यार्थी सहभागी होऊन यशस्वी सादरीकरण केले. या विभागाचे प्रमुख म्हणून प्रा.डॉ.डी.के.देडे यांनी काम पाहिले.

**मराठी विभाग-**

महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे मराठी विभागाच्यावतीने शै.वर्ष २०२३-२४ मध्ये विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र बी.ए.भाग-१ या वर्गात घेण्यात आले. पाठयक्रमातील कथेच्या आधारे कथाकथन घेण्यात आले. यामध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. याशिवाय विभागातील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय विविध स्पर्धेत सहभाग नोंदवला. पारंपारिक वेशभुषा स्पर्धेत विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विभागाच्यावतीने दि.१४/०२/२०२४ रोजी विद्यार्थ्यांचे कवि संमेलन घेण्यात आले. या विभागाचे काम विभागप्रमुख प्रा.डॉ.जवाहर मोरे काम पाहतात.

**इंग्रजी विभाग-**

महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे इंग्रजी विभागाच्यावतीने यावर्षी विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये Optional English B.A.I च्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालयास भेट दिली. विद्यार्थ्यांचे चर्चासत्र, Open Book Exam. तसेच अभ्यासक्रमावर आधारीत Videos दाखवले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी Power presentation व Magazine Reading केले. पारंपारिक वेशभुषा स्पर्धेत विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या विभागाचे काम विभागप्रमुख प्रा.डॉ.सी.एस.मुलगे हे पाहतात.



Santosh Bhimrao Patil Arts, Comm, & Science College ★ Mandrup

**भूगोल विभाग -**

या विभागांतर्गत बी.ए.भाग-१ मधील विद्यार्थ्यांचे Student सेमिनार आयोजित केले होते. ग्राम सर्वे अंतर्गत माळकवठे ता. दक्षिण सोलापूर येथे कृषी भूमी उपयोजन आणि जलसिंचन सुविधा या विषयावर सर्व्हे करण्यात आला. या विभागांतर्गत विद्यापीठस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत विविध महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच दि.०७/०२/२०२४ रोजी त्याचे बक्षिस वितरण विद्यापीठाचे प्र.कुलगुरु लक्ष्मीकांत दामा यांचे शुभहस्ते व संस्था पदाधिकारी यांच्या उपस्थितीत करण्याल आले. तर या विभागाची शैक्षणिक सहल अकलूज येथे दि.१४/०२/२०२४ रोजी आयोजित केली. होती. त्यामध्ये २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विभागाचे काम प्रा.डॉ.डी.के.देडे व प्रा.पी.बी.कांबळे हे पाहतात.

**अर्थशास्त्र व वाणिज्य अभ्यास मंडळ -**

महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे अर्थशास्त्र विभागाच्यावतीने सन २०२३-२४ मध्ये विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये बी.कॉम भाग-१ ब्रीज कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. बी.कॉम भाग-३ च्या विद्यार्थ्यांसाठी सेमिनार व गटचर्चाचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय विभागातील विद्यार्थ्यांनी तालुका व जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पारंपारिक वेशभुषा स्पर्धा,पाक कला स्पर्धा या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवत यश मिळवले.या विभागाचे काम विभागप्रमुख प्रा.श्रीमती बी.एस.कोरे या पाहतात.

**रसायनशास्त्र विभाग -**

सन २०२३-२४ या वर्षात बी.एस्सी भाग-३ च्या विद्यार्थ्यांने विद्यापीठस्तरीय आविष्कार महोत्सवात सहभाग नोंदवला. तसेच सिध्देश्वर साखर कारखाना (कुमठे) येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यानी गटचर्चा व चर्चासत्र यामध्ये सहभाग घेतला. तसेच विद्यार्थ्यांना Fire Extinguisher चा वापर कसा करायचा याचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. या विभागाचे काम प्रा.एस.एस.साळुंखे हे पाहतात.

**भौतिकशास्त्र विभाग -**

भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने विविध उपक्रम घेण्यात आले. विद्यापीठस्तरीय आविष्कार महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तसेच विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प यावर काम केले.



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी गटचर्चा व चर्चासत्र यामध्ये सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल येथे आंतरराष्ट्रीय ऑनलाईन परिषदेत सहभाग घेतला. या विभागाचे काम प्रा.एम.टी.म्हेत्रे हे पाहतात.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र -**

या केंद्राच्यावतीने भूगोल दिनानिमित्त दि.२५ जानेवारी २०२४ रोजी विद्यापीठस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन केले. यामध्ये विद्यापीठ अंतर्गत विविध महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. दि.१ फेब्रुवारी २०२४ रोजी माजी विद्यार्थी श्री.मनोज तरंगे (BSF) याची मुलाखत आयोजित करण्यात आली. यामध्ये १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या विभागाचे काम प्रा.डॉ.एस.ए.निंबर्गी यानी पाहिले.

**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष(IQAC)**

IQAC च्या वतीने दि.२९.०१.२०२४ रोजी आपल्या महाविद्यालयामध्ये NEP-२०२० School Connect Abhiyan हा कार्यक्रम पार पाडला. या कार्यक्रमामध्ये पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी प्र.कुलगुरु प्रा.डॉ.गौतम कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमासाठी ज्युनिअर कॉलेज व पदवी तृतीय वर्षातील एकूण ७१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.एस.एन.कदम होते. तर संस्थेचे विश्वस्त नागेश बिराजदार, सर्व प्राध्यापक यांची उपस्थिती होती. तसेच यावर्षी पासून शिक्षक व कर्मचारी यांच्यासाठी **पुस्तक भिशी** योजना सुरु केली आहे.या योजनेत २७ जणांनी सहभाग नोंदवला आहे.समन्वयक म्हणून डॉ.सी.एस.मुलगे हे काम पाहतात.

**प्राचार्य व प्राध्यापक यांची उल्लेखनीय कामगिरी -**

महाविद्यालयातील बहुतांश प्राध्यापकांनी अध्यापनाबरोबरच विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवले आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे-

महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.संतोष एन.कदम यांनी एकूण ०७ क्रमीक पुस्तकाचे लेखन केले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या एम.ए. अभ्यासक्रमासाठी भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्र हे पुस्तक प्रकाशित केले. त्याचप्रमाणे पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठाच्या बी.ए. व बी.कॉम.भाग-२ च्या सत्र तीन साठी पैसा व बँकिंग, लोकसंख्या शास्त्रीय अभ्यास, स्थूल अर्थशास्त्र ही क्रमीक पुस्तके प्रकाशित केली. त्याचप्रमाणे सोलापूर विद्यापीठाच्या बी.कॉम.भाग २



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

च्या सत्र चार साठी सार्वजनिक आयव्यय, भारतीय लोकसंख्याशास्त्र आणि व्यावसायिक स्थूल अर्थशास्त्र हि क्रमीक पुस्तके प्रकाशित केली.

महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ.सी.एस.मुलगे यांनी बी.ए.भाग-१ अभ्यासक्रम उपसमितीचे चेअरमन म्हणून काम पाहिले. संगमेश्वर कॉलेज,सोलापूर दि.२५/०१/२०२४.रोजी झालेल्या RAC मध्ये विषय तज्ञ म्हणून काम पाहिले. डॉ.एस.व्ही.लोढे यांच्या कॅस अंतर्गत होणा-या पदोन्नती प्रक्रियेत विषयतज्ञ म्हणून काम पाहिले. तसेच यावर्षीच्या विद्यापीठाच्या परीक्षा भरारी पथकामध्ये चेअरमन म्हणून काम पाहिले. तसेच Implementation of NEP-२०२० for University & College Teacher या विषयावरील शार्ट टर्म कोर्स पूर्ण केला.

महाविद्यालयातील हिंदी विभागाचे प्रा.डॉ.बी.एन.आदटराव यांची सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा)च्या प्रमुख कार्यवाहपदी निवड झाली. तसेच M.F.U.C.T.O, Mumbai च्या सर्वसाधारण समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती झाली.

जिमखाना विभाग प्रमुख डॉ.एस.एस.तोरवी यांनी दि.१९ ते २५जानेवारी २०२४ दरम्यान SRT नांदेड येथे आयोजित पश्चिमविभागीय आंतर विद्यापीठ खो-खो (पुरुष) स्पर्धेसाठी सोलापूर विद्यापीठ संघाचे संघव्यवस्थापक म्हणून काम पाहिले.तसेच पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेसाठी निवड समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. तसेच २४/१/२०२४ शिक्षणशास्त्र महाविद्यालय,बार्शी येथे RRCसाठी विषय तज्ञ म्हणून निवड झाली.

मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.जवाहर मोरे २२/०७/२०२३ रोजी संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात झालेल्या तासिका तत्वावरील मुलाखतीसाठी मराठी विषय तज्ञ म्हणून काम पाहिले. पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर रासेयो विभाग आयोजित प्रजासत्ताक संचलन राज्यस्तरीय चाचणी शिबिरात संयोजन समिती सदस्य व सांस्कृतिक समिती प्रमुख म्हणून काम पाहिले. डॉ.शिवाजीराव देशमुख यांच्या कथात्म साहित्य विमर्श आणि विवेचन या गौरव अंकात माझ्यासाठी परीसस्पर्श -डॉ.शिवाजीराव देशमुख हा लेख प्रकाशित. (१२/०७/२०२३) दि.४/९/२०२३ रोजी झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी कार्यशाळेत सहभाग.दिघंची, मंद्रुप, तळेहिप्परगा,गुड्डेवाडी येथे हास्यखजिना या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. दि.१८/१/२०२४ रोजी वि.गु.शिवदारे कॉलेज, एन.एस.एस. विभाग आयोजित हत्तूर येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन केले. दि.२८/०१/२०२४ रोजी वसुंधरा



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College * Mandrup

कला महाविद्यालय एन.एस.एस. विभाग आयोजित आहेरवाडी येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन केले. पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर मराठी अभ्यास मंडळाच्या अभ्यासक्रम उपसमिती सदस्य म्हणून सहभाग नोंदवला. २६/१०/२०२३ रोजी गुरुबसव्वा कल्याणशेटटी महाविद्यालय,अक्कलकोट येथील एन.एस.एस युनीट उद्घाटन समारंभात मार्गदर्शन केले. दि.३/०२/२०२४ व ०४/०२/२०२४ रोजी क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल आयोजित आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चा सत्रात सांगली जिल्हयातील दुर्लक्षित शाहीर बावाखान शेख हा शोध निबंध सादर केला. दि.५/२/२०२४ कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर आयोजित एकदिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेस लोकसाहित्य व लोकसंस्कृती यांचा सहसंबंध हा शोधनिबंध सादर केला.दै.सांगोला नगरी मध्ये वाटंबरे येथील लोकदैवत खंडोबा हा लेख प्रकाशित झाला

इतिहास विभागाचे प्रा.डॉ.एन.डी.बनसोडे यांची इतिहास विषयासाठी पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली तर भारतीय जनता पार्टी सोलापूर जिल्हा सरचिटणीस पदी निवड झाली.

भूगोल विभागाचे प्रमुख डॉ.एच.एल.जाधव यांनी बी.ए. भाग-१ एस.टी.डी. या विषयाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम तयार केला. नोव्हेंबर २०२३ मध्ये प्रकाशित झालेल्या पर्यटन नियोजन व विकास या पुस्तकात प्रकरणाचे लेखन केले. २ डिसेंबर २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये भारतीय लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावरील परिणाम या संशोधन लेखाचे प्रकाशन झाले.

भूगोल विभागाचे डॉ.डी.के.देडे यांनी दि.३/१०/२०२३ रोजी सी.बी.खेडगीज कॉलेज,अक्कलकोट येथील भूगोल अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन केले.दि.१९/०१/२०२४ रोजी सोशल महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरामध्ये मार्गदर्शन केले.युजिसी केअरलिस्ट जर्नलमध्ये ऑर्बनायझेशन ॲन्ड इटस इम्पॅक्ट ऑन ॲग्रीकल्चर हा संशोधनपर लेख प्रकाशित केला. तसेच यावर्षी लायन्स क्लब ऑफ सोलापूर मेट्रो व अपूर्वा अभिमित ज्ञानपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०४/०२/२०२४ रोजी राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

समाजशास्त्र विभागाचे प्रा.डॉ.आर.एम.मोरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्य पाहिले. दि.१०-०७-२०२३ ते दि.०९-१०-२०२३ B.A.I Sociology अभ्यासक्रम उपसमितीचा अध्यक्ष म्हणून कार्य पाहिले. दि.१६-०९-२०२३.



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

मानवविद्या शाखेचे सदस्य म्हणून कार्य पाहिले. दि.२८-०८-२०२३ ते दि.२५-१०-२०२३. विद्या परिपदेचे सदस्य म्हणून कार्य केले. दि.२७-१०-२०२३. संगमेश्वर महाविद्यालयात, सोलापूर (स्वायत्त) च्या समाजशास्त्र अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड व कार्य पाहिले. विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयाच्या संशोधन व मान्यता समितीचा (RRC) सदस्य म्हणून कार्य पाहिले. विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुल येथे PET-८ च्या विद्यार्थ्यांना Resource Person म्हणून मार्गदर्शन केले. दि. ३०-०५-२०२३. VIT वेल्लोर येथे All India Sociological Conference मध्ये Population Growth in India या शोधनिबंधाचे वाचन केले.तर दि.२८ ते ३० डिसेंबर २०२३.सोशल मिडीयाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव हा संशोधन लेख प्रकाशित केला.

राज्यशास्त्र विभागाचे डॉ.एम.सी.हजारे यांनी संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या रासेयो विभाग आयोजित बसवनगर येथे पार पडलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये लोकशाही निवडणूक प्रक्रियेतील मतदानाचे महत्व या विषयावर व्याख्यान दिले.

इंग्रजी विभागाचे प्रा.राजेश काळे यांनी पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठाच्या इंग्रजी अभ्यासमंडळाच्या पदव्यूत्तर विभागाचे सदस्य म्हणून काम पाहिले. B.A.III English या पाठयक्रमाच्या समितीमध्ये सदस्य म्हणून निवड तसेच के.बी.पी. महाविद्यालय,पंढरपूर येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये Immigration & its effects between coutries in Manjushree Thapas seasons of flight हा संशोधनपर लेख प्रकाशित केला

वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.बी.एस.कोरे यांनी दि.१२/१०/२०२३ रोजी के.बी.पी. महाविद्यालय,पंढरपूर येथील वाणिज्य अभ्यास मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. दि.२/११/२०२३ रोजी पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ व वि.गु. शिवदारे कॉलेज,सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या बी.कॉम भाग-२ अभ्यासक्रम कार्यशाळेत सहभाग नोंदवला. तसेच २६/०६/२०२३ रोजी पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर व डी.बी.एफ. दयानंद महाविद्यालय,सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० य विषयावरील एकदिवशीय कार्यशाळेत सहभाग घेतला.

भूगोल विभागाचे डॉ.एस.ए.निंबर्गी यांनी दि.१८/०५/२०२३ रोजी वि.गु.शिवदारे महाविद्यालय,सोलापूर येथे विज्ञान शाखेच्या मुलाखतीस भूगोल विषय तज्ञ म्हणून काम पाहिले.



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

दि.१८/०९/२०२३ रोजी एकदिवशीय कार्यशाळेत दयानंद महाविद्यालय,सोलापूर येथे सहभाग घेतला. दि.२६/०९/२०२३ व दि.१९/१२/२०२३ बी.एस्सी भाग-१ अभ्यासक्रमाच्या BOS Sub Committee वर काम पाहिले. तसेच Introduction to Tourism या संदर्भ ग्रंथात प्रकरणाचे लेखन केले.

भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा.एम.टी.म्हेत्रे यांनी मदुराई (कामराज युनिव्हर्ससिटी,तमिळनाडू) येथे दरम्यान ऑनलाईन रिफ्रेशर कोर्स पूर्ण केला. जानेवारी २०२४ मध्ये अमरावती विद्यापीठातून रिफ्रेशर कोर्स पूर्ण केला.तसेच International Conference on AMSCA वरती Present Poster हा उपक्रम सादर केला.

रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. एस.एस.सांळुखे यांनी मदुराई(कामराज युनिव्हर्ससिटी,तमिळनाडू) येथे दरम्यान ऑनलाईन रिफ्रेशर कोर्स पूर्ण केला. जानेवारी २०२४ मध्ये अमरावती विद्यापीठातून रिफ्रेशर कोर्स पूर्ण केला. महाविद्यालयीन आविष्कार संशोधन मध्ये परिक्षक म्हणून काम केले.

भौतिकशास्त्र विभागाच्या प्रा.डॉ.जे.डी.नादरगी यांना राष्ट्रीय गुरव संघ सोलापूर २०२३ चा जिल्हास्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार मिळाला. तर Maharashtra Acedamy of Science चा Young Associate Purskar मिळाला. आंतरराष्ट्रीय दर्जाचे ५ शोध निबंध प्रकाशित केले. विद्यापीठाच्य युवा महोत्सवात संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.महाविद्यालय व विद्यापीठस्तरीय आविष्कार महोत्सवात सहभाग नोंदवला.

वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ.के.यु.गरड यांनी दि.१८ जून २०२३ रोजी बोन्साय क्लब सोलापूर आयोजित कार्यशाळेत उपस्थित राहून सोलापूर जिल्हयातील दुर्मिळ वनस्पती यावर मार्गदर्शन केले. पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठांच्या वनस्पतीशास्त्र अभ्यासक्रमानुसार ९ पुस्तकांचे लिखाण केले.

गणित विभागाचे प्रा.व्ही.एस.आटकर यांनी रामानुजन कॉलेज (दिल्ली युनिर्व्हसिटी) दि.२ ते ३१ डिसेंबर २०२३ दरम्यान ऑनलाईन ओरिएंटेशन कोर्स पूर्ण केला.

मराठी विभागाचे प्रा.व्ही.के.साळवे यांना श्रीमंत योगी प्रतिष्ठानचा व श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने देण्यात येणारे अनुक्रमे दोन आदर्श पत्रकार पुरस्कार मिळवले. तसेच ते दै.दिव्य मराठीमध्ये विविध अंगी विषयावर लेखन केले.

मराठी विभागातील डॉ.एल.एम.कट्टीमनी यांनी दि. १२ व १३ ऑक्टोंबर २०२३ रोजी विद्यापीठाच्या युवा महोत्सव मध्ये संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. तसेच दि.१६ ऑगस्ट २०२३



Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

रोजी वचनपूर्ती या लघू पटात मुलाच्या आईची भूमिका केली. आंतरराष्ट्रीय बहुभाषिक जर्नल मध्ये अनुराधा पाटील यांच्या स्त्रीवादी कविता हा शोधनिबंध सादर केला. ५ फेब्रुवारी २०२४ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत साहित्य समाज आणि संस्कृती हा शोध निबंध सादर केला.

भौतिकशास्त्र विभागाचे प्रा.पी.बी.दहिवडे यांनी जून २०२३ मध्ये Structural, Morphologacal, and Electrochemical Analysis of Electrodes या वर संशोधनपर लेख प्रकाशित केला.

रसायनशास्त्र विभागाचे प्रा.पी.एच.कुलकर्णी यांना विद्या विकास प्रतिष्ठान, सोलापूर चा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला.

एकूणच आमच्या महाविद्यालयाने सोलापूर जिल्हयात व विद्यापीठ कार्यक्षेत्रात वेगळा ठसा उमटविला आहे. शिक्षण,उदबोधन आणि प्रशासन यातून ऐतिहासिक कामगिरी नोंदविली आहे. ही कामगिरी आम्ही अशीच उंचावत ठेवू असा आम्हाला विश्वास आहे.

वरील सर्व उपक्रम, संशोधनपर वाटचाल सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या संस्थेचे सर्व पदाधिकारी व पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, आमचे प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी,पालक, मंद्रुप ग्रामपंचायत आणि सीना-भीमा खो-यातील सर्व हितचिंतक यांच्या सहकार्य व प्रोत्साहनामुळेच आम्ही यशस्वीरित्या पार पाडू शकलो याची मला जाण आहे. म्हणून आम्ही सर्वांच्या ऋणातच राहू इच्छितो.

धन्यवाद !

Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Science College ★ Mandrup

I/c Principal
Santosh Bhimrao Patil Arts, Comm.
& Science College, Mandrup